ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.


वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53

वर्ष ३१ | पुणे, बुधवार १५ डिसेंबर, १९६५ | अंक १२



# विविध माहिती

**शस्त्रक्रियेच्या हत्यारांचे प्रदर्शन**—मुंबईमध्ये रशियात तयार होणाऱ्या शस्त्रक्रियेच्या हत्यारांचे एक प्रदर्शन उघडण्यात आले आहे. प्रदर्शनातील हत्यारे भारतामधील परिस्थितीत वापरता येण्यासारखी ठेवण्याबद्दल कटाक्ष ठेवण्यात आला आहे. मद्रास येथे रशियाच्या सहकार्याने शस्त्रक्रियेच्या हत्यारांचा जो कारखाना काढण्यात येत आहे, त्यात तयार करण्यात येणाऱ्या हत्यारांचे नमुनेच ह्या प्रदर्शनात मांडण्यात आले आहेत.

**गुजरातमधील अन्नधान्याची तूट**—गुजरात राज्यात अन्नधान्याची तीव्र टंचाई भासू लागली आहे. ग्रामीण भागातील लोकांनी आपली शिधाकार्डे परत करावीत आणि शहरातील लोकांनी आपला धान्याचा वापर २५ टक्क्यांनी कमी करावा म्हणून सरकार प्रयत्न करीत आहे. गुजरात राज्याची स्थापना १९६० साली झाली. त्या वेळी राज्याला दरसाल १८ लाख टन धान्याची तूट भासत असे. त्यानंतर शेती विकासाची कामे करून धान्याची पैदास ८ लाख टन वाढविण्यात आली आहे.

**रणांगणावरील गरजांची कल्पना**—भारताचे सरसेनानी जन. चौधरी ह्यांनी रणांगणावरील गरजांची व प्रश्नांची संरक्षण-खात्यात काम करणाऱ्या शास्त्रज्ञांना कल्पना यावी म्हणून त्यांना युद्धबंदीनजीकच्या आघाडीवरील दौऱ्यांवर पाठविले आहे.

**यांत्रिक हत्यारांची निर्यात**—हिंदचे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन आणि झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणे हिंदुस्थान मशीन टूल्स कारखाना १० लाख रुपये किंमतीची यांत्रिक हत्यारे झेकोस्लोव्हाकिआला निर्यात करणार आहे. औद्योगिकदृष्ट्या आघाडीवर असलेल्या देशाला इतक्या मोठ्या प्रमाणावर यंत्रसामग्री पुरविण्याचा भारताचा हा पहिलाच प्रयत्न आहे.

**स्वित्झरलंडचे भारताला साह्य**—स्वित्झरलंडच्या पार्लमेंटने भारताला ६·३ कोटी स्विस फ्रँक्स अथवा ५·२५ कोटी रुपयांचे व्यापारी कर्ज मंजूर केले आहे. कर्जाचा उपयोग करून भारताने मांडवली मालाची आयात करावयाची आहे. ह्यापैकी निम्मे कर्ज स्वित्झरलंडचे सरकार देणार असून बाकीचे स्वित्झरलंडमधील बँकांचा एक गट देणार आहे. कर्जासंबंधीचा करार चालू वर्षाच्या आरंभी करण्यात आलेला आहे.

**अशुद्ध तेलाच्या उत्पादनात वाढ**—अंकलेश्वर येथील अशुद्ध तलाच्या उत्पादनात वाढ करण्याचे तेल आणि नैसर्गिक वायु-मंडळाने ठरविले आहे. अंकलेश्वर येथील तेलखाणीत रोज ४,८०० टन तेलाच्या निर्मितीऐवजी आता ५,५०० टन तेल उत्पादन करण्यात येणार आहे. मंडळ रोज ३,३०० टन अशुद्ध तेल मुंबईच्या तेलशुद्धीच्या कारखान्याला पाठविते आणि १,५०० टन तेल गुजरातच्या तेलशुद्धीच्या कारखान्याला पाठविते.

**कोचीन बंदरात तरती यारी**—कोचीन बंदरात वापरण्यासाठी हॉलंडकडून एक स्वयंचलित तरती यारी मिळविण्यात आली आहे. ती एका वेळी १२० टनांचे ओझे उचलू शकते. कोचीन पोर्ट ट्रस्टला यारीसाठी ६७ लाख रुपये किंमत यावी लागली. ही यारी आल्यामुळे बंदरात येणाऱ्या बोटींवरील अवजड सामान अधिक त्वरेने उचलून घेणे शक्य होईल आणि परिणामीं बोटी लवकर रिकाम्या केल्या जातील.

**आशियासाठी विकास बँक**—मॅनिला येथे एशियन डेव्हलपमेंट बँकेची सनद तयार करण्यात येत आहे. ह्या बँकेचे संकल्पित मांडवल १०० कोटी डॉलर्सचे आहे. मांडवलापैकी ६० टक्के मांडवल आशियातील देशांनी गोळा करावे असे सनदेच्या मूळ मसुद्यात ठरविण्यात आले आहे. २० कोटी डॉलर्स मांडवल अमेरिका देणार आहे. ऑस्ट्रेलिआ, इराण व मलेशिया ह्यांनी आपल्या वाटणीच्या मांडवलात वाढ केली आहे.

**तेलशुद्धीच्या कारखान्याचा विस्तार**—गोहाटी येथील सार्वजनिक मालकीच्या तेलशुद्धीच्या कारखान्याची उत्पादन क्षमता वाढवून ती ११ लाख टनापर्यंत करण्यात येणार आहे. कारखान्याच्या विस्ताराची योजना भारत सरकारकडे पाठविण्यात आली आहे. विस्तारासाठी परदेशीय चलनाची अडचण भासणार नाही. कारण, कारखान्यात रूमेनिया सहकारी असून जरूर ते परदेशीय चलन उपलब्ध करून देण्याचे त्याने मान्य केले आहे.

**गुजरातची नवी राजधानी**—अहमदाबादपासून १५ मैलावर कलोल ह्या ठिकाणी गांधीनगर ह्या नांवाने गुजरातची नवी राजधानी उभारण्यात यावयाची आहे. ह्या कामासाठी गुजरात सरकारने मध्यवर्ती सरकारकडून २० कोटी रुपयांची मदत मागितली आहे. मदतीपैकी ५० टक्के मदत देणगी म्हणून आणि ५० टक्के कर्ज म्हणून देण्यांत यावी असे गुजरात सरकारचे म्हणणे आहे. ह्या प्रश्नासंबंधी भारत सरकारने अद्याप काही निर्णय घेतलेला नाही. राजधानीचा आराखडा तयार करण्यात आला असून त्याप्रमाणे काम करण्यास सुमारे ३२ कोटी रुपये खर्च येणार आहे.

**निर्यात वाढविण्याचे प्रयत्न**—भारताचा संरक्षणखर्च वाढत असल्यामुळे आणि परदेशीय मदत वेळेवर येत नसल्यामुळे परदेशीय चलन अधिक प्रमाणात मिळविण्याची गरज विशेष उत्कट झाली आहे. अपुरा पाऊस आणि काही निर्यात मालाचा अपुरा पुरवठा असूनही मध्यवर्ती सरकारचे व्यापारखाते ह्या वर्षी ८३५ ते ८४० कोटी रुपयांचा माल निर्यात करण्याची खटपट करीत आहे. गेल्या वर्षापेक्षा हे लक्ष्य २० कोटींनी अधिक आहे.

**रशिया विजेचे दिवे घेणार**—भारतात तयार होणारे अनेक प्रकारचे कमीअधिक शक्तींचे विजेचे दिवे घेण्याची तयारी रशिआने दाखविली आहे. त्याशिवाय विजेरीसाठी वापरण्यात येणारे छोटे दिवेही घेण्यास रशिआ उत्सुक आहे. चहा, कॉफी सारखे पदार्थ गरम ठेवणारे हिंदी बनावटीचे थर्मासही रशिआतील ग्राहकांना पटले आहेत.

**जगाची लोकसंख्या**—१९६४ च्या मध्याच्या सुमारास जगाच्या लोकसंख्येत ६ कोटींची भर पडून ती ३२२ कोटींच्या घरात गेली. इतर खंडांतील लोकसंख्येशी तुलना करता आशिआ खंडातील लोकसंख्या सर्वात अधिक म्हणजे १७८·३ कोटी आहे. युरोपची लोकसंख्या ४४ कोटी आहे. आफ्रिकेची लोकसंख्या ३०·४ कोटी आहे. उत्तर अमेरिकेची २८·६ कोटी आहे आणि रशिआची २२·८ कोटी आहे. लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा अनुक्रम जगात दुसरा लागतो. हिंदुस्थानची लोकसंख्या ४७ कोटींवर असून त्याहीपेक्षा अधिक लोकसंख्या चीनची आहे. चीनची लोकसंख्या ६८ कोटींपेक्षा अधिक आहे.

# अर्थ

बुधवार, १५ डिसेंबर, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सरहद्दीजवळील प्रदेशातील उद्योगधंदे

### बँकांनी युद्धकाळांत आपली कामगिरी कशी बजावली ?

पाकिस्तानी आक्रमणामुळे निर्माण झालेल्या युद्धपरिस्थितीत सरहद्दीजवळील प्रदेशातील व्यापारी बँकांनी आपली कामगिरी चोख रीतीने पार पाडली नाही, अशी तक्रार ऐकू येत होती. त्याबाबत पूर्ण चौकशी करून इंडियन बँक्स असोसिएशनने एक पत्रक प्रसिद्ध केले आहे. ही तक्रार वस्तुस्थितीला सोडून असल्याचे त्यात म्हटले आहे.

पाकिस्तानी आक्रमणानंतर पंजाबच्या सरहद्दीजवळील मुलखात उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांना खूपच हादरा बसला व ते विस्कळीत झाले, हे सत्य आहे. वाहतुकीच्या साधनांच्या अभावी ट्रकसनी किंवा आगगाड्यांनीं आपला तयार माल पाठविणे त्यांना शक्य झाले नाही; कच्चा मालही त्यांना मिळू शकला नाही. खाजगी सावकारांकडून लहान व मध्यम आकाराच्या व्यापाऱ्यांना व कारखानदारांना कर्जपुरवठा होत असे, तो पूर्णपणे बंद पडला. देशाच्या इतर भागांतून नव्या ऑर्डरी येईनाशा झाल्या. आधी दिलेल्या ऑर्डरी रद्द होऊ लागल्या आणि आधी पाठविलेल्या मालाच्या पोटी काढलेल्या हुंड्या न स्वीकारल्या जाण्याचे प्रमाण बरेच वाढले. त्यामुळे व्यापारी व कारखानदार ह्यांच्याजवळील साठे वाढले.

युद्ध सुरू झाल्यावर व्यापारी बँकांनी सरहद्दीजवळील प्रदेशातील आपल्या शाखाधिकाऱ्यांना सूचना दिल्या. त्यांनी काळजीपूर्वक व्यवहार करावे, बँकांच्या हितास जपावे, विशेषतः बँकेच्या कचेऱ्यांची जागा आणि बँकेकडे गहाण असलेल्या मालाची गोडाउन्स, फॅक्टऱ्या, मिल्स व इतर जागा ह्यांच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष द्यावे, असे त्यांना सांगण्यांत आले. ज्या फॅक्टऱ्यांच्या जागांचा इमर्जन्सी रिस्क इन्शुअरन्स कायद्याखाली विमा उतरविणे कायद्याने आवश्यक आहे, त्यांचा जरूर तेवढा विमा उतरविण्याकडे सतत लक्ष ठेवण्याची त्यांना सूचना करण्यात आली. कोणत्याही बँकेने दिलेले कर्ज परत मागितले नाही. मालाचे उत्पादन व त्याचा उठाव ह्यांस बाधक होईल असे काहीही करू नये, चालू कर्जमर्यादेतील व्यवहार चालू ठेवावेत, अशा स्पष्ट सूचना शाखाधिकाऱ्यांना दिलेल्या होत्या. वाहतुकीच्या अडचणी, सरहद्दीवरील मुलखाकडे पाठविलेले रजिस्टर्ड टपाल स्वीकारण्यास पोस्ट खात्याचा नकार, हुंडी ज्यांच्यावर काढलेली आहे, अशा कित्येकांनी केलेले स्थलांतर, इत्यादी कारणांमुळे शाखांनी डिस्कौंटिंगचा व कलेक्शनचा व्यवहार स्थगित करावा असे त्यांना सांगितले होते. पण, असा व्यवहार आपले स्वतःचे जोखमीवर करण्यास हरकत नाही अशी संबंधित गिऱ्हाइकाने लेखी हमी दिली, तर तो करण्याचे तारतम्य वापरण्याची शाखाधिकाऱ्यांना परवानगी होती. तारा व टेलिफोन ह्यांच्या दळणवळणात गंभीर व्यत्यय आलेला होता. त्यामुळे शाखांतील कॅशमध्ये भर घालण्यासाठी कॅश पाठविणे किंवा ती वर्ग करणे अशक्य होऊन बसले. त्यामुळे, स्वतःच्या कॅशच्या आवाक्यापलीकडे बिले डिस्कौंट करणे शाखांना अशक्य होऊन बसले.

वरील खऱ्याखुऱ्या अडचणींमुळे किंवा सावधगिरीच्या भावनेमुळे काही मॅनेजरांनी जे उपाय योजले त्या कारणाने काही व्यक्तींची गैरसोय झाली असणे शक्य आहे. परंतु त्याची युक्तायुक्तता त्या वेळची परिस्थिती लक्षात घेऊनच ठरविली पाहिजे. बँकांच्या मध्यवर्ती कचेरीला ह्या गोष्टी निदर्शनास येताच, नेहमीच्या कर्जाच्या मर्यादेत कर्जपुरवठा चालू ठेवण्याबाबत शाखांना सूचना देण्यात आल्या.

सरहद्दीजवळील कारखान्यांची कुचंबणा होऊ न देण्याबाबत बँकांनी विशेष दक्षता घेतली. प्रत्यक्ष भेट देऊन समक्ष पाहणी करण्यासाठी व्यापारी व कारखानदार ह्यांच्या प्रतिनिधींची भेट घेण्यासाठी, पुढील सहा महिन्यांच्या गरजांचा अंदाज बांधण्यासाठी काही बँकांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तिकडे मुद्दाम रवाना केले. हेतू हा, की ह्या गरजांस अनुसरून कर्जविषयक धोरणे व पद्धती ठरविता याव्या. ह्या पाहणीस अनुसरून बँकांनी कर्जविषयक अटी सैल केल्या. त्यांना शक्य होते ते सर्व त्यांनी केले. क्रेडिट मर्यादेत १० ते १५% वाढ, सध्याच्या मार्जिनमध्ये १० ते १५% कपात, आयात केलेल्या मालतारणास मार्जिन नाही, लोखंड–पोलादाच्या नियंत्रित जातीच्या मालावर नाममात्र मार्जिन, न स्वीकारली गेल्यामुळे परत आलेली बिलें पुनः डिस्कौंटसाठी घेण्याची तयारी, इत्यादी मार्गांनी बँकांनी मदत केली.

बँकांचे स्वतःजवळच फंड मर्यादित असल्यामुळे नव्या गिऱ्हाइकांना कर्जमर्यादा मंजूर करणे बँकांना शक्य होत नाही, तरीसुद्धा सरहद्दीजवळील गिऱ्हाइकांच्या बाबतीत अपवाद करण्यात आले. गेल्या काही आठवड्यांत त्यांना नव्या कर्जमर्यादा मंजूर करण्यात आल्या असून त्यांचा त्यांनी उपयोगही करून घेतला आहे. बँकांनी आपल्या शाखाधिकाऱ्यांना स्वतःचे तारतम्य वापरून तात्पुरत्या (मुख्य कचेऱ्या त्यास मागून मंजुरी देईल ह्या अपेक्षेने) कर्जमर्यादा वाढविण्याचे व मार्जिन कमी करण्याचे अधिकार दिले आहेत.

सरहद्दीजवळील प्रदेशातील उद्योगधंद्यांच्या बाबतीत बँकांनी इतके उदारतेचे धोरण ठेवले, तरीसुद्धा तेथील उद्योगधंद्यांकडून कर्जवाढीची मागणीच फारशी येत नाही. ह्याचा अर्थ, औद्योगिक उत्पादन न वाढण्याची कारणे इतर असली पाहिजेत. पुरेशा नव्या मागणीचा अभाव, त्यामुळे उत्पादनात घट आणि बेकारीत भर, अशी कारणपरंपरा दिसते. मध्यवर्ती आणि राज्य सरकारांनी सरहद्दीजवळील उद्योगधंद्यांना प्राधान्य देऊन त्यांच्याकडे ऑर्डरी देणे, हा एक उपाय आहे.

---

### सरकारी पाठ्यपुस्तकांत चीनची प्रशस्ती !

जम्मू आणि काश्मीर सरकारने प्रसिद्ध केलेल्या पाठ्यपुस्तकांत चीन व इंडोनेशिया ह्यांच्याविषयी गौरवपर उल्लेख आहेत, असे आढळून आले आहे ! राज्याचे मुख्य मंत्री श्री. सादिक हेच स्वतः शिक्षणमंत्री आहेत. हे उल्लेख रद्द करण्यात येतील असे त्यांनी जाहीर केले आहे.

### गव्हाच्या आयातीत स्पर्धा होण्याची लक्षणे

अमेरिका भारताला दीर्घ मुदतीच्या कराराने गहू देण्यास तयार आहे की नाही ह्याबद्दल खात्रीलायक काहीच सांगता येण्यासारखे नाही. परंतु अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया ह्या भरपूर गहू पिकविणाऱ्या देशांना फक्त भारतच काय ते गिऱ्हाईक आहे असे मानण्याचे कारण नाही. कम्युनिस्ट गटातील देशांतही अन्नधान्याचा तुटवडा असल्याने तेही देश वरील देशांकडून गव्हाची आयात करण्याचे प्रयत्न करीत आहेत. अलीकडे कॅनडाच्या गहू-मंडळाने रशियाला ५० लाख टन गहू विकला आहे. हा सर्व गहू कॅनडाने १२ महिन्यांच्या मुदतीत रशियाला पोचता करावयाचा आहे. चीनमधील अन्नधान्याचे उत्पादन तेथील लोकसंख्येच्या गरजेला पुरण्यासारखे नाही. चीनमधील तांदुळाचे उत्पादन अलीकडे घटलेच आहे. गव्हाचे उत्पादन थोडेफार वाढले असले तरी ते अजून १९५५–५९ च्या सरासरीपर्यंत पोचलेले नाही. अलीकडे चीनमधील लोकांच्या खाण्यात धान्याचा समावेश अधिक प्रमाणात होत आहे. चीनने १९६१ मध्ये जवळजवळ ५० लाख टन गहू आयात केलेला होता. १९६६ मध्ये चीनची मागणी ६० लाख टनांच्या आसपास जाण्याची शक्यता आहे. रशियाने ९५ लाख टन गव्हाच्या आयातीचा करार कॅनडाशी केला आहे. गेल्या सहा वर्षांत गव्हाचा आंतरराष्ट्रीय व्यापार वाढत चाललेला आहे. रशिआ, पूर्व युरोप आणि चीन ह्यांच्या मागणीमुळे ही व्यापारवृद्धी झालेली आहे. दोन वर्षांपूर्वी जगांतील गव्हाच्या व्यापाराचे उत्पादनाशी प्रमाण २७ टक्के होते ते चालू हंगामात आणखीच वाढले. दरम्यान गहू पिकविणाऱ्या देशांतील साठा मात्र १० टक्क्यांनी कमी होईल. १९५३ सालानंतर कमी झालेल्या साठ्यांपैकी हा सर्वांत कमी साठा आहे.

---

### भारत पूर्व–आफ्रिका व्यापारात वाढ

भारताच्या व्यापारी प्रतिनिधींचे एक मंडळ पूर्व आफ्रिकेचा दौरा करण्यासाठी गेले होते. पूर्व आफ्रिकेतील युगांडा, टँझानिआ आणि कीनिआ ह्या देशांशी व्यापारी करार करण्यात मंडळाला यश आले आहे. व्यापारी कराराची फलश्रुती म्हणून वरील देशांशी होणाऱ्या भारताच्या व्यापारात ३३ टक्के वाढ होईल अशी अपेक्षा करण्यात येत आहे. भारत आणि हे देश ह्यांच्या दरम्यान स्नेहाचे संबंध बरेच वर्षांपासून असल्याने करार करणे सोपे गेले अशी माहिती मध्यवर्ती सरकारचे व्यापारमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनी दिली. श्री. मनुभाई शहा हे प्रतिनिधी मंडळाचे नेते होते. उभयता देशांतील आर्थिक संबंधाविषयी बोलताना ते म्हणाले कीं, पश्चिम युगांडात एक मोठा साखर कारखाना ताबडतोब काढण्याची त्या सरकारची इच्छा आहे. संकल्पित कारखान्याची उत्पादनक्षमता ५० हजार टनांची असेल. त्याचप्रमाणे टँझानिआमध्ये एक कापडाची गिरणी काढण्याचे घाटत आहे. कापड गिरणीच्या उभारणीच्या कामी टँझानिआचे सरकार एका हिंदी उद्योगपतीशी सहकार्य करणार आहे. त्याशिवाय टँझानिआत दार-एस्-सलाम ह्या ठिकाणी एक औद्योगिक वसाहत स्थापन करण्यात यावयाची आहे. ह्या वसाहतीत उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी सल्लामसलत व मार्गदर्शन ह्यांची सोय करण्यात येईल. भारत सरकारच्या मदतीने कीनिआने औद्योगीकरणाचा मोठा कार्यक्रम हाती घेण्याचे ठरवले आहे. भारताच्या सहकार्याने कीनिआत एक कापडाची गिरणी उभारण्यात येणार आहे. तींत २५ हजार चात्या आणि ६०० माग असतील.

### छोट्या शेतकऱ्यांच्या शेतीच्या विकासाला मदत

जमिनीचे लहान लहान तुकडे कसणारा छोटा शेतकरी हा आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्यामुळे त्याला आपल्या शेतीचा विकास घडवून आणणे फार अवघड जाते. ही अडचण लक्षात घेऊन गुजरात स्टेट कोऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँकेने अशा शेतकऱ्यांना पुरेशी आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. गुजरात राज्यात ५ एकरांपेक्षा कमी असलेली जमीन कसणारे सुमारे १० लाख तरी शेतकरी आहेत. त्यांना बँकेच्या निर्णयाचा फायदा मिळणार आहे. शेतकऱ्याच्या जमिनीची किंमत ठरविण्याची कसोटी आता त्याला अधिक अनुकूल अशी ठरविण्यात येणार आहे. आतापर्यंत जमिनीची किंमत शेतकरी सरकारला जितका सारा भरतो त्याच्या २०० पट ठरविण्यात येत असे. पण येथून पुढे जमिनीची किंमत ३५० पट धरण्यात येणार आहे. बँकेने ठरविलेल्या मदत योजनेप्रमाणे शेतकऱ्याला त्याच्या जमिनीच्या किंमतीच्या १५० टक्के रक्कम शेतीचा विकास करण्याच्या कामासाठी आगाऊ देण्यात येईल. जमीनसुधारणा करण्यासाठी एवढी रक्कम पुरे होईल असा बँकेचा अंदाज आहे. गुजरात राज्यातील शेतकऱ्यांची संख्या सुमारे २० लाख आहे. त्यांपैकी ५० टक्के शेतकऱ्यांजवळ असलेली जमीन ५ एकर अगर त्यापेक्षाही कमी आहे. बँकेने छोट्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी ह्या वर्षी १० कोटी रुपयांची तरतूद केली होती; परंतु मदतीच्या नव्या योजनेप्रमाणे आता १५ कोटी रुपयांची गरज लागण्याचा संभव आहे. अन्नधान्याची तूट भरून काढण्यासाठी बँक आपल्या परीने खूप खटपट करीत आहे. ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांत बँकेने शेतकऱ्यांना नेहमीपेक्षा जवळ जवळ दुपटीने पैसा पुरविला आहे. ह्या मदतीचा उपयोग करून शेतकरी पाणी उपसण्यासाठी एंजिने आणि विजेच्या मोटारी खरेदी करतील अशी अपेक्षा आहे.

---

### गुजरातला तेलापर मिळणारी रॉयल्टी

गुजरात राज्यात निर्माण करण्यात येणारे अशुद्ध तेल राज्याबाहेर पाठविण्यात आल्यास त्यावर राज्य सरकारला रॉयल्टी देण्यात येत असते. गेल्या चार वर्षांच्या अवधीत राज्याबाहेर पाठविण्यात आलेल्या तेलावरील रॉयल्टीच्या रूपाने राज्याला १·६१ कोटी रुपयांची प्राप्ती झाली आहे. ह्या बाबतीत नेहरू निवाड्यात दिलेल्या निर्णयाला अनुसरून प्रत्येक टन तेलामागे गुजरातला ७·५० रुपये देण्यात येतात. १९६४–६५ सालात गुजरातने ७·५० लाख मेट्रिक टन तेल राज्याबाहेर पाठविले. त्यामुळे राज्याला ५६·९० लाख रुपयांचे उत्पन्न झाले. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या ५ महिन्यांत राज्याला २५·९१ लाख रुपये रॉयल्टी मिळाली. गुजरात राज्याच्या १७ जिल्ह्यांपैकी ७ जिल्ह्यांत तेलखाणीचा शोध करण्याचे परवाने तेल व नैसर्गिक वायुमंडळाला देण्यात आले आहेत. आतापर्यंत २७ परवाने देण्यात आले आहेत.

---

### महाराष्ट्रातील ११ शहरांत रेशनिंग

पुरेसा अन्नाचा साठा झाल्यानंतर पुढील ११ शहरांत महाराष्ट्र राज्य रेशनिंग सुरू करणार आहे:—

बृहन्मुंबई व त्यासभोवारची औद्योगिक वस्ती, पुणे व त्यासभोवारची वस्ती, नागपूर व त्यासभोवारची वस्ती, सोलापूर व त्यासभोवारची वस्ती, कोल्हापूर, अहमदनगर, नाशिक, मालेगाव, अमरावती, अकोला आणि औरंगाबाद.

## दर माणशी उत्पादनाचे तुलनात्मक आकडे

१९६३ मधील दर माणशी अंतर्गत उत्पादनाचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांतील १५ देशांचे आकडे येथे दिले आहेत.

| देश | दर माणशी उत्पादन ( डॉलर ) |
| --- | --- |
| अमेरिका | २,७९० |
| स्वित्झरलंड | १,९५१ |
| प. जर्मनी | १,८७९ |
| ऑस्ट्रेलिया | १,६८० |
| ग्रेट ब्रिटन | १,४९७ |
| फ्रान्स | १,४९३ |
| टर्की | २९२ |
| सिलोन | १४१ |
| फिलिपाइन्स | १२७ |
| चीन ( तैवान ) | १२१ |
| थायलंड | ११२ |
| नैजेरिया | १०२ |
| सुदान | ८० |
| बर्मा | ७५ |
| भारत | ७४ |

## साखरेच्या निर्नियंत्रणाला विरोध

नगर जिल्ह्यातील अशोक सहकारी साखर कारखान्याच्या वार्षिक साधारण सभेत साखरेवरील नियंत्रणे काढून टाकू नयेत अशी विनंती सभेसाठी जमलेल्या २ हजार शेतकऱ्यांनी भारत सरकारला केली. साखरेवरील नियंत्रणे काढून टाकण्यात आली तर साखरेची किंमत उतरेल आणि शेतकऱ्याच्या उसाला वाजवी भाव देणे साखर कारखान्यांना परवडणार नाही, अशी भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली. उसाच्या किंमती ठरविण्याबद्दलच्या सरकारी धोरणावरही टीका करण्यात आली. भारत सरकारने अशोक सहकारी कारखान्याला आपली गळिताची शक्ती ५०० टनांनी वाढविण्याची परवानगी दिली आहे. विस्ताराचा हा कार्यक्रम अमलात आणण्यासाठी कारखान्याला १·१० कोटी रुपयांचे भांडवल लागेल. त्यापैकी ६० लाख रुपये इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशन देणार असून बाकीचे ठेवी घेऊन व भाग-भांडवल विकून जमा करण्यात येणार आहे.

## न्यूयॉर्क शहरवासीयांची नवी डोकेदुखी

न्यूयॉर्क हे शहर जगातील सर्वांत मोठे शहर असून तेथील नागरिकांना पाण्याची टंचाई, वाहतुकीतील अडथळे, दूषित हवा, इत्यादी संकटांना तोंड द्यावे लागत आहेच. परंतु अलीकडे शहरवासीयांच्या मनात एका नवीन भीतीने घर केले आहे. अण्वस्त्रे तयार करण्यासाठी लागणारे अनेक प्रकारचे भाग ह्या शहरातून बहुधा रात्री वाहून नेले जातात. ह्यापैकी काही भागांचा स्फोट होऊन शहरावर आपत्ती तर कोसळणार नाही ना, अशी शंका नागरिकांच्या मनात ठाण मांडून आहे. हे निरनिराळे भाग एकत्र करूनच अण्वस्त्रांची सिद्धी करण्यात येते. काही कमी-अधिक होऊन अपघात झाल्यास शहरावर त्याचे गंभीर परिणाम होतील. ज्या ज्या वेळी अशा प्रकारचे अण्वस्त्रांचे भाग शहरातून वाहून नेले जात असतात, त्या त्या वेळी न्यूयॉर्क शहरातील अग्निशामक दलाची पथके अण्वस्त्राचे भाग वाहून नेणाऱ्या वाहनांना काळजीपूर्वक मार्गदर्शन करीत असतात.

सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —


* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-१८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| वसूल भांडवल | ... | रु. | १०·२२ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १५·७८ „ |
| ठेवी | ... | रु. | ४४३·६२ „ |
| खेळते भांडवल | ... | रु. | ४८१·१५ „ |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.




महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग - सांगली ( महाराष्ट्र )

## लुधिआना येथे नवे दुग्ध व्यवसाय केंद्र

पंजाबमध्ये लुधिआना येथे ७५ हजार लिटर दुधावर संस्करण करणारे एक केंद्र सार्वजनिक मालकीच्या विभागात स्थापन करण्यात येणार आहे. भारत सरकार आणि संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेतकी उपसंघटनेच्या दरम्यान ह्याविषयी नुकताच करार करण्यात आला आहे. दूध गार करणे, ते साठविणे व तापविणे, दुधाच्या बाटल्या धुणे व त्यात दूध भरणे इत्यादी सर्व प्रकारच्या क्रिया करणारी यंत्रसामग्री भारताला पुरविण्यात येणार आहे. यंत्रसामग्री नीट चालण्यासाठी लागणारे सुटे भाग वेळोवेळी पुरविण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. ह्या सर्व यंत्रसामग्रीची किंमत सुमारे ८ लाख डॉलर्स होईल. दूध केंद्र चालविण्यासाठी लागणारे तांत्रिक साह्य संघटनेचे अन्न व शेतकी खाते देणार आहे. ह्या कामासाठी लागणारे तज्ज्ञ भारतातच मिळण्यासारखे आहेत.

## केळीपासून तंतूंचे उत्पादन

केळीच्या झाडापासून कृत्रिम तंतू तयार करण्याचे यंत्र तयार करण्यात आले आहे. ह्या तंतूंचा उपयोग करून जिनसा बांधण्यासाठी लागणारे कापड, दोरखंडे, सुतळ्या, पायपुसणे, व कापडही तयार करता येते. गुजरात राज्यात ज्या ठिकाणी केळींच्या बागा आहेत तेथे ह्या यंत्राचा चांगला उपयोग होऊ शकेल. राज्य सरकारने ह्या शोधाला आर्थिक साह्य देऊ केले आहे.

## सौदी अरबस्तानात वनस्पतीचा कारखाना

मुंबईतील एक कारखाना सौदी अरबस्तानात वनस्पती तेलाचा कारखाना काढण्यास साह्य करणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ३० लाख रुपये भांडवल लागणार असून त्यापैकी ५० टक्के भांडवल हिंदी कारखाना पुरविणार आहे. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री, इतर साधनें व तांत्रिक ज्ञान भारतीय कारखानाच उपलब्ध करून देईल.

## युगोस्लाव्हियाची मदतीची तयारी

युगोस्लाव्हियांतील उद्योगपतींचे एक प्रतिनिधी मंडळ नुकतेच गुजरातचा दौरा करून गेले. गुजरातमधील कारखानदारीसंबंधी त्यांनी बरीच आस्था दाखविली असून, अनेक प्रकारच्या कारखान्यांच्या स्थापनेसाठी मदत करण्याची तयारी दाखविली आहे. गुजरात राज्यात साखर कारखाने, सिमेंटचे कारखाने, सोडा अॅश इत्यादी कारखाने काढण्याच्या कामी तांत्रिक ज्ञानही युगोस्लाव्हिया पुरवील.

## कोळशाच्या तुटवड्याचा परिणाम

पूर्व पाकिस्तानात दगडी कोळशाचा व जळणाच्या तेलाचा तुटवडा पडू लागल्यामुळे तेथील तागाच्या धंद्यावर वाईट परिणाम झाला आहे. भारत व पाकिस्तान ह्यांचा संघर्ष सुरू झाल्यापासून पूर्व पाकिस्तान अलग पडले आणि कोळशाचा व तेलाचा पुरवठा बंद पडला. परिणामी तागाच्या गिरण्यातील काम कमी झाले व कच्च्या तागाची किंमत एकदम घसरली. पूर्व पाकिस्तान कोळशासाठी भारतावर अवलंबून आहे.

**आंतरराज्य थेट मार्ग**—गुजरात आणि महाराष्ट्र राज्यांच्या मोटार राज्य वाहतूक संघटनेने उभयता राज्यातील काही ठिकाणात आणखी थेट मार्ग चालू करण्याचे ठरविले आहे. अशा मार्गामुळे प्रवाशांची सोय होते आणि प्रवास करण्यास वेळही कमी लागतो. दोन्ही राज्यांच्या संबंधित संघटनांच्या अधिकाऱ्यांनी ह्या बाबतीत बैठक घेऊन चर्चा केली. ज्या मार्गावर वाहतूक चालू करावयाची आहे त्या मार्गावरील रस्त्यांच्या परिस्थितीविषयी विचारविनिमय करण्यात आला. आता अधिकारी आपआपल्या सरकारला शिफारसी करतील.

**शेतीसाठी स्वस्त वीजपुरवठा**—शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या विजेचे दर स्वस्त असावेत असे आग्रहाचे प्रतिपादन मध्यवर्ती पाणी व वीजपुरवठा मंत्री श्री. राव ह्यांनी केले आहे. त्यांनी अशी माहिती सांगितली, की रशियात इतर ग्राहकांपेक्षा शेतकऱ्याला कमी दराने वीज पुरविली जाते. त्यांना दरात ७५ टक्के सूट देण्यात येते. अमेरिका, कॅनडा, नॉर्वे, जपान ह्या देशांतून ग्रामीण भागाच्या वीजपुरवठ्यासाठी सवलतीच्या दराने कर्जे दिली जातात.

**अपंग जवानांना सवलत**—भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत झालेल्या संघर्षात अनेक भारतीय जवान अपंग झाले. त्यांच्या आयुर्विम्यासाठी द्यावयाचे पुढील हप्ते आयुर्विमा कार्पोरेशनने घेऊ नयेत असा आदेश भारत सरकारने दिला आहे. कच्छमधील लढाईत ज्या जवानांना अपंगत्व प्राप्त झाले त्यांनाही ह्या सवलतीचा फायदा मिळणार आहे. रणांगणावर अपंग झालेल्या जवानांना सेवानिवृत्तांच्या यादीत दाखल करण्यात येते. अपंगत्वाची कमी-अधिक तीव्रता लक्षात घेऊन विम्याच्या हप्त्यात कमी-अधिक सूट देण्यात आलेली आहे. जवान अपंग आहे तोवरच त्याला ह्या सवलतीचा फायदा घेता येईल. हप्त्यांतील सुटीमुळे नफ्यासहित विम्यांवरील नफा मिळण्यात अडचण येणार नाही.

**निर्यातीसाठी सुताच्या गिरण्या**—निर्यातीसाठी सुताच्या काही खास गिरण्या काढण्याचा विचार भारत सरकारने चालविला आहे. ह्या गिरण्या सार्वजनिक मालकीच्या विभागात असतील आणि ज्या राज्यांतून बंदरांच्या चांगल्या सोयी आहेत त्यांचे राज्यात त्या काढण्यात यावयाच्या आहेत. तथापि, संकल्पित गिरण्यांच्या जागा अद्याप निश्चित करण्यात आलेल्या नाहीत. नव्या गिरण्यांतून राज्य सरकारांना भाग घेऊ द्यावा की नाही ह्याविषयी अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही.

**विमानात सिनेमा पाहण्यासाठी पैसे**—आंतरराष्ट्रीय वाहतूक करणाऱ्या काही विमान कंपन्या आपल्या प्रवाशांना मोफत चित्रपट दाखवीत असत आणि त्यांचा जाहिरातीसाठी उपयोग करीत असत. पण आता ३७ प्रमुख आंतरराष्ट्रीय प्रवासी विमान कंपन्यांनी ह्यासंबंधी एक करार केला आहे. ह्यापुढे विमानात चित्रपट पाहण्यासाठी प्रवाशांना पैसे द्यावे लागतील.

**विकासावरील खर्चाला कात्री**—पाकिस्तानच्या सरकारने आर्थिक विकासासाठी करण्यात येणाऱ्या खर्चात कपात करून, ते पैसे लष्कराच्या गरजा भागविण्यासाठी वापरावयाचे ठरविले आहे. पाकिस्तानच्या ह्या निर्णयामुळे सामाजिक सुखसोयींवरील खर्च पहिल्याप्रथम कमी करण्यात येईल. पाकिस्तानच्या गेल्या वर्षाच्या अंदाजपत्रकात विकासासाठी ४४६·५० कोटी रुपयांची तरतूद होती. पण त्यातीलही २३·५ कोटी रुपये लष्करी गरजांकडे देण्यात आले.

## कापड गिरण्यांपुढील समस्या

### वाढत्या साठ्यांचा प्रश्न

पाकिस्तानबरोबरचे युद्ध थांबल्यानंतर कापडाची मागणी वाढेल, ही अपेक्षा फोल ठरली आहे. ह्या दिवसात सामान्यतः जेवढी मागणी असावयास पाहिजे, त्या मानाने ती बरीच कमी आहे. गेल्या वर्षापेक्षा कापडाचे उत्पादन कमी होऊनही साठे वाढत चालले आहेत. ऑक्टोबर अखेर ४,६९,००० गासड्या कापड (१ गासडी = १५०० यार्ड) आणि १,७७,००० गासड्या सूत (१ गासडी = ४०० पौंड) पडून आहे, त्याची किंमत ९३ कोटी रु. भरेल. त्यामुळे गिरण्यांना उत्पादन कमी करणे भाग पडत आहे. कित्येक राज्यांतील वीजपुरवठ्यातील कपातीचाही उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. उत्पादनात घट, कच्च्या मालाच्या किंमती वाढल्यामुळे उत्पादन खर्चात वाढ आणि मजुरीची वाढती रक्कम, ह्यामुळे गिरण्यांना गेल्या वर्षापेक्षा कमी नफा होणे अपरिहार्य आहे. कपाशीचा पुरवठा अपुरा असून त्याची किंमत भरमसाठ वाढली आहे. राहणीच्या खर्चाच्या वाढत्या मानाप्रमाणे महागाई भत्ता वाढत आहे. कापडाच्या किंमती काही अंशी नियंत्रित असून त्यात मंजूर होणारी वाढ उत्पादन खर्चातील वाढीच्या कमीच पडत राहते. १९६५-६६ मधील हिंदी कपाशीचे पीक ५२ लक्ष गासड्यांचे पेक्षा अधिक येण्याचा संभव नाही. १९६४-६५ मध्ये हिंदी गिरण्यांनी जेवढी कपास वापरली, तिचेपेक्षा हा आकडा ४,००,००० गासड्यांनी कमी आहे आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या ७० लक्ष गासड्यांच्या लक्ष्यापेक्षा १८ लक्ष गासड्यांनी कमी आहे. गेल्या वर्षी भारताने ८,१८,००० गासड्या कपास आयात केली होती. चालू मोसमात एवढी आयात करणे भारताला अशक्य आहे. त्यामुळे कपाशीचा पुरवठा मर्यादित राहणे अपरिहार्य आहे.

टेक्स्टाइल कमिशनरने हिंदी कपाशीच्या खरेदीवर नियंत्रण घातले आहे. ह्यापुढे कुठल्याही गिरणीला गेल्या वर्षीच्या उठावाच्या ठराविक प्रमाणापेक्षा ज्यास्त कपास खरेदी करता येणार नाही किंवा स्वतःजवळ साठवून ठेवता येणार नाही. कपास लावणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाला योग्य किंमत येण्याविषयी आता काळजी करण्याचे कारणच नाही. १९६५-६६ च्या मोसमासाठी कपाशीची कमाल किंमत दर खंडीस ७५ ते १०० रु. एवढी वाढवून दिलेली आहे, परंतु कमाल किंमतीला किमान किंमत करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू राहिला, तर नवल नाही.

---

### हिंदी सायकलींचे वाढते उत्पादन

१९६२-६३ मध्ये भारताने १०,००० सायकली निर्गत केल्या होत्या, १९६३-६४ मध्ये ४४,००० सायकलींची निर्गत झाली आणि १९६४-६५ मधील निर्गत ५०,००० सायकली एवढी होईल अशी अपेक्षा आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेचे प्रारंभी भारतात तयार होणाऱ्या सायकलीत विदेशी अंश ८०% होता; हे प्रमाण आता ३% ते ४% वर उतरले आहे. ही आयात चालू राहिली तरच सायकलींचे उत्पादन वाढविता येईल. १९६५-६६ मध्ये भारतात एकूण १७ लक्ष सायकलींचे उत्पादन होईल; योजनेचे लक्ष्य २५ लक्ष सायकलींचे होते. सायकलींच्या किंमतीवरील सरकारी नियंत्रण काढून टाकण्यात यावे, अशी सायकल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. अभिजित सेन, ह्यांनी मागणी केली आहे.

---

### परदेशी पुस्तकांच्या व नियतकालिकांच्या आयातीत कपात

परदेशीय चलनाच्या टंचाईने भारताच्या सर्वच आर्थिक जीवनावर दाट सावली टाकली आहे. ह्या सावलीतून परदेशातून आयात करण्यात येणारी पुस्तके आणि नियतकालिकेही अर्थातच सुटलेली नाहीत. सरकारने ह्या आयातीसाठी अतिशय तुटपुंजे परदेशीय चलन मंजूर केल्यामुळे अनेकांना त्यांच्या आवडीचे नेहमीचे परभाषांतील लिखाण वाचावयास मिळणे कठीण होत जाणार आहे. दिल्लीमधील काही संबंधित एजंटांनी आपल्या ग्राहकांना ह्याची कल्पना देण्यास सुरुवात केली आहे. ह्या बाबतीत सरकार आपल्या भूमिकेची फेरतपासणी करील असे वाटत होते. परंतु अजून तरी तसे काही घडलेले नाही. त्यामुळे काही एजंटांना आपला धंदा बंद करावा लागेल की काय अशी भीती वाटू लागली आहे. परदेशी चलनाच्या अनिश्चित परिस्थितीत परदेशातील प्रकाशकांकडे ग्रंथांच्या मागण्या नोंदविणेही कठीण झाले आहे. ह्या बाबतीत सरकारचे म्हणणे असे आहे की, १९६३-६४ साली परदेशी वाङ्मयाच्या आयातीसाठी ८ कोटी रुपयांचे परवाने देण्यात आले होते, परंतु प्रत्यक्ष व्यवहारात ३.५ कोटी रुपयेच वापरण्यात आले. गेल्या वर्षाचे आकडेही वरील आकड्यांच्या जवळपास आहेत. १९६४-६५ साली ७ कोटी रुपयांचे परदेशीय चलन परवान्याद्वारा मंजूर करण्यात आले असता त्यापैकी फक्त ३ कोटी रुपयांच्या चलनाचाच उपयोग करण्यात आला. ह्यावरून ह्या आयातीसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनात कपात करता येण्यासारखी आहे असे दिसते. दरम्यान सरकारने फक्त ९० लाख रुपयांचे परदेशीय चलन ह्या वर्षासाठी मंजूर केले आहे. ही रक्कम फारच तुटपुंजी असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. परदेशाहून समुद्रमार्गाने आयात होणाऱ्या पुस्तकांचीच तेवढी नोंद होते; विमानाने येणाऱ्या छोट्या पार्सलांची नोंद होत नाही. अशा परिस्थितीत मंजूर चलनाचा अपुरा वापर होतो असे म्हणणे अवघड आहे.

---

### ना. अण्णासाहेब शिंदे ह्यांचा आग्नेय आशियाचा दौरा

केंद्र सरकारच्या समाजविकास व सहकार खात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी ना. अण्णासाहेब शिंदे हे दिनांक २९ नोव्हेंबर १९६५ रोजी भारत सरकारचे प्रतिनिधी म्हणून आग्नेय आशियाच्या थायलंड, लाओस, कंबोडिया, सिंगापूर, मलेशिया, सिलोन, फिलिपाईन्स आदी देशांच्या दौऱ्यावर गेले आहेत. आंतरराष्ट्रीय वातावरणात भारताची भूमिका प्रभावीपणे वरील राष्ट्रांना पटवून द्यावी म्हणून त्यांच्यावर केंद्र सरकारने ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी टाकली आहे. ते २१ डिसेंबर रोजी परत येतील.

अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या वतीने त्यांचा मोठ्या थाटाने सत्कार करण्यात आला.

---

### "माझ्या पगारावर लहान जंतूही जगणार नाही."

एका शिक्षकाच्या पगाराच्या चेकचे पैसे देतेवेळी बँक कॅशिअर म्हणाला, "नोटा कोऱ्या करकरीत नाहीत, जरा जुन्या आहेत; त्याबद्दल माफ करा. जंतूंची तुम्हाला भिती वाटत नसेलच." शिक्षकाने उत्तर दिले, "त्याची काळजी नको; माझ्या पगारावर अगदी लहान जंतूही जगू शकणार नाही."

---

## सहकारी साखर कारखान्यांच्या परिसराचा आर्थिक कायापालट

[श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि., गंगानगर–इचलकरंजी, जिल्हा–कोल्हापूर, ह्याचे चेअरमन, श्री. रत्नाप्पा कुंभार, ह्यांचे निवेदन]

पंचगंगा सहकारी साखर कारखान्याची दररोज १००० टन ऊस गाळप करण्याची शक्ति होती. कारखान्याच्या परिसरातील वाढत्या ऊसाचे क्षेत्र आणि इतर आवश्यक ती अनुकूलता लक्षांत घेऊन, आणखी अधिकांत अधिक सामान्य शेतकऱ्यांना कारखान्यामध्ये सामील करून घेण्याच्या उद्देशाने कारखान्याची ऊस गाळपाची शक्ति १००० टनांवरून २००० टन होऊन मिळावी म्हणून, सन १९६२ सालापासून करीत असलेल्या प्रयत्नाला यश आले असून, कारखान्याची दररोजची ऊस गाळपाची शक्ति १००० टनांवरून २६०० टनांची करण्याची मंजुरी दिनांक २५ ऑगस्ट १९६५ रोजी मिळाली आहे. कारखान्याच्या वाढलेल्या या गाळपशक्तीच्या पूर्ततेसाठी लागणारी मशिनरी व इतर लागणारी साधनसामग्री यांसाठी एकूण एक कोटी पंचाहत्तर लाख रुपये भांडवली खर्च लागणार आहे. त्याची योजना करण्यात आली आहे. या कामाची पूर्तता लवकरांत लवकर करून १९६६–६७ सालच्या गळित हंगामातील ऊस गाळता येईल याच दृष्टीने प्रयत्न होत आहे. या गाळपशक्तीच्या वाढीमुळे कारखान्याच्या इतिहासात एक मोठे नवे पान सुरू होत आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा, भोगावती, कुंभी-कासारी, वेदगंगा, दूधगंगा व वारणा या पाच सहकारी साखर कारखान्यांना मिळून संयुक्तपणे, काकवीपासून (मोलॅसिस) पॉवर अल्कोहोल निर्मितीकरिता पॉवर अल्कोहोल प्लँट व डिस्टिलरी काढण्यास परवानगी मिळावी म्हणून कारखान्याच्या प्रमुखत्वाखाली १९६२ सालापासून प्रयत्न चालू होते. त्या प्रयत्नालाही अहवाल साली यश आले आणि मागणीस अनुसरून पॉवर अल्कोहोल प्लँट व डिस्टिलरी स्थापन करण्यासाठी भारत सरकारकडून परवाना मिळालेला आहे. पॉवर अल्कोहोल प्लँट व डिस्टिलरी स्थापन करण्याचे कामही वर्ष–दीड वर्षाच्या कालावधीत पूर्ण होऊन संबंधित सहकारी साखर कारखान्याच्या काकवीचा (मोलॅसिस) उपयोग किफायतशीरपणे करून घेता येणार आहे.

कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्ह्यांच्या परिसरातील पंचगंगा, वारणा, कृष्णा व शेतकरी या चार सहकारी साखर कारखान्यांनी मिळून उसाच्या चिपाडापासून (बॅगस) कागद तयार करण्यासाठी भारत सहकारी कागद कारखाना काढण्याचे ठरवून त्यासंबंधी सर्व प्रकारची प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी या चारही कारखान्यांचे चेअरमन व भारत सरकारचे व महाराष्ट्र राज्य सरकारचे प्रतिनिधी यांनी २५ सप्टेंबर, १९६४ ते ११ नोव्हेंबर, १९६४पर्यंत ४५ दिवसांचा जागतिक दौरा केला. त्या दौऱ्यामध्ये मिळालेल्या माहितीस अनुसरून महाराष्ट्र सरकारच्या व भारत सरकारच्या सहकार्याने हा कागद कारखाना काढण्याचे निश्चित केले. सुरुवातीस १२ कोटी रुपये भांडवलाचा हा कारखाना व्हावा अशी कल्पना होती. पण दररोज ३०० टनी न्यूजप्रिंटचा कागद तयार करणारा, २७ कोटी रुपये भांडवली खर्चाचा हा कागद कारखाना काढावा असा विचार झाला आहे. त्यासाठी लागणारा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्याचे काम महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने अमेरिकेतील प्रसिद्ध कारखानदार मेसर्स बेलॉइट कंपनीच्या आयोटला पद्धतीवर आधारून कॅनडामधील मेसर्स सॅडवेल आणि कंपनी यांचेकडे व त्याचप्रमाणे मेक्सिकोमधील डॉ. कुसी यांच्या पद्धतीवर आधारून इंग्लंडचे मेसर्स सायमन हँडलिंग यांचेकडे अशा दोन कंपन्यांचेकडे महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने सोपविण्यात आले आहे. यथाकाल या कामाची पूर्तता होऊन अखिल भारतामध्ये मोठी व अभिनव अशी ही कारखानदारी या भागात उभी राहील, अशी निश्चिती झाली आहे.

कारखान्याच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर जिल्हा कार्यक्षेत्र असलेली, विणकरी व शेतकरी यांच्या संयुक्त मालकीची २५,००० चात्यांची सहकारी सूत गिरणी मंजूर झाली असून, या कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणीच्या प्रत्यक्ष कामाला तारीख ११ जून, १९६५ रोजी भारत सरकारचे अन्न व शेती खात्याचे मंत्री नामदार श्री. सी. सुब्रह्मण्यम् यांचे शुभ हस्ते भूमिपूजनाने सुरुवात झाली आहे. या सूतगिरणीचा भांडवली खर्च १ कोटी, ५० लाख रुपये होणार असून, हजारो शेतकरी आणि विणकरी यांचे जीवन सुखी व समृद्ध होणार आहे.

आपल्या साखर कारखान्याच्या वतीने कारखान्याच्या परिसरांतील कृष्णा, पंचगंगा, दूधगंगा, व वारणा या नद्यांवर शेतीला पाणीपुरवठा करण्याकरिता आयोजित करण्यात आलेल्या एकूण २५,००० एकरांच्या व एक कोटी रुपये खर्चाच्या एकूण ४० सहकारी पाणीपुरवठा योजनांपैकी (१) औरवाड (२) गौरवाड (३) शिरटी (४) चिंचवाड (५) उभळवाड (६) दानवाड, (७) आकिवाट–बस्तवाड व रूई–कबनूर या आठ योजना मंजूर झाल्या असून, त्यासाठी सरकारची आर्थिक मदत प्रत्यक्ष मिळाली आहे आणि या योजनांच्या प्रत्यक्ष बांधकामाला अहवाल साली सुरुवात झाली आहे.

खेडेगावातून शेतवाडीला जाणाऱ्या पाणंद रस्त्याची बांधणी व दुरुस्तीचे काम कोणत्याही सरकारी योजनेमध्ये आतापर्यंत नोंद झालेले नाही. पाणंद रस्त्याच्या दुरुस्तीवरच शेतकऱ्यांचे खरे जीवन अवलंबून असल्याने या रस्त्याची बांधणी आणि दुरुस्ती करण्याकरिता सरकाने मंजुरी द्यावी म्हणून आमच्या कारखान्याचे वतीने आणि महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाच्या वतीने १९६२ पासून प्रयत्न करण्यात आले. त्याला अहवाल साली यश आले आणि महाराष्ट्र राज्य सरकारने महाराष्ट्रांतील २० सहकारी साखर कारखान्यांना त्या त्या साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील या रस्त्याच्या बांधणीसाठी प्रत्येक कारखान्यास दोन लाख रुपयेप्रमाणे एकूण चाळीस लाख रुपये मंजूर केले. या कामासाठी प्रत्येक कारखान्याने पंचाहत्तर हजार रुपये खर्च करावयाचे आहेत. रस्त्यांच्या या अभिनव योजनेमुळे शेतकऱ्यांच्या प्रगतीचा नवा मार्ग खुला झाला आहे. सविस्तर माहिती इतरत्र अहवालामध्ये दिली आहे.

पाच पिकांच्या (उस, कापूस, भुईमूग, तंबाखू व जोंधळा), सहकारी क्षेत्रांत साखर धंद्याच्या प्रशिक्षणासाठी व संशोधनासाठी संस्था स्थापनेचे प्रयत्न, शिक्षणविषयक सोयी, इत्यादींचाही परिचय अहवालात करून दिलेला आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी

माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

## स्वयंपाकासाठी द्रव पेट्रोलच्या टाक्या

इंडिअन ऑइल कंपनीने स्वयंपाकासाठी वापरावयाचे जळण म्हणून द्रव पेट्रोल तयार करून ते टाक्यांनी पुरविण्याची व्यवस्था केली आहे. कलकत्ता शहरात ह्या टाक्या आता मिळू लागल्या असून लोकांची मागणीही चांगली येत आहे. भारतामधील मोठ्या शहरांतून अलीकडे काही खाजगी मालकीच्या पेट्रोल कंपन्या अशा प्रकारचे इंधन पुरवीत आहेतच. आता सरकारी मालकीच्या कंपनीने ह्या क्षेत्रात पदार्पण केले आहे. पाकसिद्धी करण्यासाठी वापरण्याचे हे जळण वापरण्यास सोपे आणि स्वच्छतेला पोषक असे आहे. परंतु त्याची किंमत काहीशी डोईजड असते. इंडिअन ऑइल कंपनीने जळण साठविण्याच्या टाक्याही स्वतःच बनविल्या आहेत. सध्या पुरवठा करणाऱ्या खाजगी कंपन्या द्रव पेट्रोल व टाक्या दोन्हीही काही प्रमाणात परदेशातून आयात करतात. संपूर्णतया देशी बनावटीचे इंधन म्हणून कंपनीच्या पुरवठ्याची किंमत स्वस्त होणे जरूर आहे.

## कर्जाच्या अटी सैल होण्याचा संभव

भारताचे अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी जपानच्या दौऱ्यावर गेले आहेत. भारत आणि जपान ह्यांच्यामधील संबंधाविषयी ते जपानशी बोलणी करणार आहेत. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी जपानकडून मिळू शकणाऱ्या आर्थिक साह्याची कल्पना करून घेण्यासाठी आणि उभयता देशांमधील आर्थिक सहकार्याविषयी अंदाज बांधण्यासाठी ते तिकडे गेले आहेत, असे म्हणतात. गेल्या दोन वर्षांपासून जपान भारताला जी मदत देत आहे त्यात फारशी वाढ होण्याचा संभव नाही. जपान भारताला दरसाल सुमारे २८·५०कोटी रुपयांचे साह्य देत आहे.जपानकडून मिळणाऱ्या ह्या कर्जाच्या परतफेडीची मुदतवाढ, विशिष्ट विकासकामाशी बांधल्या गेलेल्या कर्जाऐवजी निर्बंधरहित कर्जे आणि व्याजाच्या दरात कपात, ह्या सवलती मात्र जपानकडून मिळण्यासारख्या आहेत.

## मध्यवर्ती सरकारच्या १९ मंत्र्यांचे १४ आठवड्यांत १९ परदेशप्रवास

लोकसभेच्या गेल्या अंदाजपत्रकी अधिवेशनानंतरच्या १४ आठवड्यांच्या काळात मध्यवर्ती सरकारचे १३ मंत्री—उपमंत्री ह्यांनी मिळून १९ परदेशी वाऱ्यांवर १,३८,००० रु. खर्च केले. सर्वांत ज्यास्त रकम १९,९९४ रु. विदेश मंत्री श्री. स्वर्णसिंग ह्यांनी खर्च केली. ते प्रथम आफ्रिका देशांकडे आणि नंतर ग्रेटब्रिटनला गेले होते. पोलाद—खाणी मंत्री श्री. संजीव रेड्डी ह्यांनी भिलाई—दुर्गापूर—रूरकेला कारखान्यांच्या विस्तार योजनांसाठी सहा देशांचा प्रवास केला, त्याला १८,९०६ रु. लागले. पंतप्रधान श्री. शास्त्री हे रशिया, कॅनडा, युगोस्लाव्हिया आणि ग्रेट ब्रिटनला जाऊन आले, त्यांचा खर्च १६,४१८ रुपयांत भागला.

## सरकारी अधिकाऱ्यांचे प्रवास

१ जानेवारी, १९६४ ते १५ ऑगस्ट, १९६५ ह्या मुदतीत १६८९ सरकारी अधिकाऱ्यांनी ४८ परदेशांना भेटी दिल्या. त्यासाठी ९४,९३,३१९ रु. खर्च आला. त्यांतील परदेशी हुंडणावळीचा भाग२६,३५,३१२ रु. होता.

## इन्कम–टॅक्सची थकबाकी १९३ कोटी रु.

३१ मार्च १९६५ रोजी १९३ कोटी रुपयांची इन्कम-टॅक्सची थकबाकी वसूल व्हावयाची राहिली होती. १९६४–६५ मध्ये एकूण ५८ कोटी रुपयांची थकबाकी वसूल करण्यात आली.

## जपानी औद्योगिक तरते प्रदर्शन
### भारतीय बंदरांना भेटी

सकुरा मारू ह्या आगबोटीवर मांडण्यात आलेले जपानी औद्योगिक प्रदर्शन पूर्व आणि आग्नेय आशियातील १४ प्रमुख बंदरांना भेट देणार आहे. पाकिस्तानच्या कराची आणि चितगांव बंदरांना हे प्रदर्शन भेट देणार होते, पण पाकिस्तानने परवानगी रद्द केली. त्यामुळे भारताच्या मुंबई आणि कलकत्ता बंदराबरोबर मद्रास आणि कोचीन बंदरांसही ते आता भेट देईल. सकुरा मारू ही आगबोट प्रदर्शन मांडण्याच्या दृष्टीनेच बांधण्यात आली आहे. ही १२,६११ टनी बोट जपान इंडस्ट्री फ्लोटिंग फेअर असोसिएशनच्या मालकीची आहे. जपानी औद्योगिक प्रगतीची परदेशीयांना माहिती करून देणे व परदेशी बाजारपेठा मिळविणे, हा त्याचा उद्देश आहे. ह्या तरत्या प्रदर्शनात ६०० कारखानदारांच्या वतीने ९५ फर्म्सनी ४०६ स्टॉल्समध्ये ११,००० नमुने मांडले आहेत. त्या नमुन्यांचीच किंमत पाऊण कोटी रुपये भरेल. औद्योगिक नमुन्यांच्या प्रदर्शनासाठीच केवळ बांधलेली जगातील ही एकमेव आगबोट आहे. तिच्या बांधणीला सुमारे ४ कोटी रु. खर्च आला. आगबोट पूर्णपणे एअर कंडिशण्ड आहे. प्रेक्षकांच्या सोईसाठी वेगवेगळे मजले एस्केलेटर्सनी व एलेव्हेटर्सनी जोडलेले आहेत. प्रेक्षकांच्या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देऊ शकतील असे प्रतिनिधी आगबोटीतून प्रदर्शनाबरोबर प्रवास करतात. प्रदर्शनाच्या व्यवस्थेसाठी २४० जपान्यांचा ताफा आहे.

प्रदर्शनाची ही बोट मद्रास येथे ८ ते १२ डिसेंबर होती. २० ते २४ डिसेंबर कोचीन, २६ ते ३१ डिसेंबर मुंबई आणि ६ जानेवारी ते ९ जानेवारी कलकत्ता हा तिचा पुढचा कार्यक्रम आहे.

## रोजनिशीतील पाने

[ले. व प्र.—श्री. वि. गाडगीळ ७ ई/२ सदाशिव, पुणे २. पृष्ठे १२४, मूल्य रु. २]

सुप्रसिद्ध वकील श्री. श्री. वि. गाडगीळ यांनी रोजनिशीतील पाने महाराष्ट्र मासिकातून प्रसिद्ध करण्याचा स्तुत्य उपक्रम चालू केलेला आहे. १९६३ साली त्या लेखनातील काही भाग पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले होते. १९६३ सालातील उर्वरित 'रोजनिशीतील पाने' पहिल्या आवृत्तीस जोडून आता सदर पुस्तकाची ती द्वितीयावृत्ती म्हणून नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. लेखकाने प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे 'अशा लेखनाने आपण जगात डोळस व संवेदनाक्षम पद्धतीने वावरावयास शकतो... व मनातील ताजेपणा नेहमी कायम राहतो.' प्रस्तुत पुस्तक वाचताना लेखनाचा हा अनुभव पदोपदी प्रत्ययास येतो. जीवनात भेटणाऱ्या व्यक्ति, स्थळे व प्रसंग यांचे हळुवार कुंचल्याने श्री. गाडगीळ यांनी चित्रण केले असून ते मनोवेधक तर ठरले आहेच, पण पुस्तकाने श्री. गाडगीळ यांच्या व्यक्तित्मवावर चांगलाच प्रकाश पडला आहे. प्रस्तुत पुस्तक वाचल्यावर या आत्मचरित्राचे पुढील भाग वाचण्यास वाचक उत्सुक होतील अशी अपेक्षा वाटते.

—ना. तु. ठाकुर

## पेशंटांना नुकसानभरपाई

पेशंटवर चुकीच्या शस्त्रक्रिया करणे, चुकीचा पाय कापणे, कापूस किंवा उपकरणे शरीराच्या आत राहून जाणे, अशा शस्त्रक्रियेतील चुकांमुळे नुकसानभरपाईदाखल १९६४ मध्ये इंग्लंडमधील पेशंटांना सुमारे ४ कोटी रुपये मिळाले.

**दुधाची सक्तीने वसुली**— कलकत्त्यामधील सरकारी दूधपुरवठ्याच्या योजनेला दुधाची टंचाई तीव्रतेने भासू लागली आहे. ह्या योजनेला रोज १५ हजार लिटर दूध कमी पडत आहे. तुट भरून काढण्यासाठी सरकारने दुधाची सक्तीने वसुली करण्याचे ठरविले आहे. दुधाचा घाऊक व्यापार करणाऱ्यांकडून त्यांच्याजवळील दुधापैकी काही दूध सरकार सक्तीने सरकारी दूधपुरवठा योजनेसाठी घेणार आहे.

**उसाऐवजी गव्हाची लागवड**—महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती लक्षांत घेऊन श्रीरामपूर–कोपरगाव भागातील स्टेट फ़ार्मिंग कॉर्पोरेशनकडे घेतलेल्या जमिनींपैकी २,५०० एकरात उसाऐवजी गव्हाची लागवड करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ह्या भागातील शेतकऱ्यांनी अधिक गहू पिकविण्याच्या मोहिमेला चांगली साद दिली असून उसाचे दुसरे पीक घ्यावयाचे नाही असे ठरविले आहे.

**पाकिस्तानचे अणुशक्ती केंद्र**—कराची येथे उभारण्यात येणाऱ्या अणुशक्ती केंद्राच्या उभारणीसाठी वापरावयाचा वीज उत्पादक पाकिस्तानने जपानकडून घेण्याचे ठरविले आहे. ह्या जनरेटरच्या साह्याने १ लाख, ३८ हजार किलोवॅट वीज निर्माण करता येईल. कराची येथील अणुशक्तीचे केंद्र कॅनडाची जनरल इलेक्ट्रिक कंपनी उभारणार आहे. जनरेटर विकत घेण्यासाठी जपानने पाकिस्तानला कर्ज दिले आहे.

**चीनची ट्रॅक्टर्सची खरेदी**—आंतरराष्ट्रीय व्यापारपेठांतून मिळेल तो माल घेण्याचे धोरण चीनने आखले आहे. चीन व स्पेन ह्यांच्या दरम्यान नुकताच एक मोठा व्यापारी करार झाला. कराराप्रमाणे स्पेनकडून चीनने २ हजार ट्रॅक्टर्स खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**स्वास्थ्याचा आभास करणारी औषधे**—मनाला स्वास्थ्य देण्यासाठी अगर हुरूप वाटण्यासाठी अनेक प्रकारची रासायनिक औषधे अलीकडे उत्पादन करण्यात येतात. पुढारलेल्या देशांप्रमाणेच इतर देशांतही ह्या औषधांचे सेवन करण्याची वृत्ती तरुणांत झपाट्याने फैलावत आहे,अशी माहिती जागतिक आरोग्य संघटनेने दिली आहे. ह्या औषधांचे परिणाम अखेर घातक असल्याने सर्व सरकारांनी त्यांचे उत्पादन, विक्री अगर वाटप ह्यांच्यावर नियंत्रणे घालावी असे सुचविण्यात आले आहे.

**गीतांजलीच्या हस्तलिखिताची प्रत** — भारत सरकारने अमेरिकेतील हारवर्ड विद्यापीठाकडून रवींद्रनाथ टागोरांच्या गीतांजलीची प्रत मिळविली आहे. ती कलकत्ता येथील राष्ट्रीय पदार्थसंग्रहालयात ठेवण्यात येणार आहे. गीतांजलीच्या मूळ हस्तलिखित प्रतीची ती नक्कल असून ती मायक्रोफिल्म करण्यात आलेली आहे. मूळची इंग्रजी प्रत देण्यास विद्यापीठाने नकार दिला आहे.

**कोयना येथील अल्युमिनमचा कारखाना**—भारत ॲल्युमिनम ही कंपनी एका जर्मन कंपनीच्या सहकार्याने कोयनानगर येथे ॲल्युमिनमचा कारखाना उभारणार आहे. कारखान्याच्या पहिल्या टप्प्याची उत्पादनक्षमता २५ हजार टनांची असेल. दुसऱ्या टप्प्यात उत्पादनक्षमता ५० हजार टनांपर्यंत वाढविण्यात येणार आहे. जर्मन कंपनी कारखान्याचा आराखडा पुरविणार असून यंत्रसामग्रीही देणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी १८ कोटी रुपये खर्च येईल.

कळविण्यास आनंद वाटतो की आमची
१०० शंभरावी
शाखा
स्वारगेट, पुणे ९ येथें दि. १७ रोजी सुरू होत आहे.
दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
रजिस्टर्ड आफीस: ११७७ बुधवार पेठ पुणें २
6525

हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.